RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष २, अंक १४६] शुक्रवार, नोव्हेंबर ११, २०१६/कार्तिक २०, शके १९३८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक २८७

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**नगरविकास विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० नोव्हेंबर २०१६

**आदेश**

**महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा व परिरक्षण कायदा, २०११.**

क्रमांक भिनिम. २०१६/प्र.क्र.४४५/नवि-२३.–ज्याअर्थी, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेचे कर्मचारी व कामगार दिनांक ३० ऑक्टोबर २०१६ पासून दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदान व इतर मागण्यांकरिता बेकायदेशीर संपावर आहेत ;

आणि ज्याअर्थी, भिवंडी शहरातील साफसफाई, देखभालीसंबंधी व घनकचरा व्यवस्थापनाच्या कामात अडथळा निर्माण झालेला आहे तसेच शहरातील नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर दुष्परिणाम होणार आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा व परिरक्षण कायदा, २०११ (Mah. XII of 2012) च्या कलम २ च्या पोट-कलम (क) च्या पोट-कलम (तीन) च्या तरतुदीनुसार रुग्णालये व दवाखाने यांच्यासह, सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता राखण्याच्या संबंधातील कोणतीही सेवा, सार्वजनिक आरोग्य व साफसफाई देखभालीसंबंधीच्या सेवा या अत्यावश्यक सेवा आहेत ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा व परिरक्षण कायदा, २०११ (Mah. XII of 2012) च्या कलम २ च्या पोट-कलम (क) च्या पोट-कलम (पाच) अन्वये स्थानिक प्राधिकरणांच्या कामकाजाशी संबंधित असलेली कोणतीही सेवा किंवा पद अत्यावश्यक सेवा आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त महानगरपालिकेच्या कर्मचारी व कामगारांनी केलेल्या बेकायदेशीर संपामुळे भिवंडी शहरातील सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता या अत्यावश्यक सेवा विस्कळीत होऊ शकते ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे की, उक्त महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या अत्यावश्यक सेवांतील संपास बंदी घालणे लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे.

यास्तव, आता महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अधिनियम, २०११ (सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १२) चे कलम ४ चे पोट कलम (१) च्या तरतुदीस आधीन राहून महाराष्ट्र शासन याद्वारे उक्त महानगरपालिकेच्या कर्मचारी व कामगारांस संपास मनाई करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**अनिष परशुरामे,**
शासनाचे उप सचिव.

Scanned by CamScanner